D:\BACKUP 24-06-2014-DESKTOP-Asmit

वाचले :- १) मा. महापालिका सभा ठराव क्र. ५०२४ दि. १०/१०/२००३
२) आदेश क्र. लेखा/१अ/कावि/३५१/२०१६ दि. २५/४/२०१६
३) भारत सरकार, वित्त विभागाचे पत्र क्र. १/३/२००८- E.II(B) दिनांक ९/११/२०१६
४) पिंपरी चिंचवड महानगरपालिका कर्मचारी महासंघ यांचे पत्र क्र महासंघ/५१/२०१६ दिनांक २४/११/२०१६ व त्यावरील मा.महापौर यांच्या दिनांक २८/११/२०१६ च्या सूचना
५) कायदा सल्लागार पिं.चिं. मनपा यांचेकडील पत्र क्र कास/२/कावि/२२/२०१६ दि.६/१/२०१६ अन्वये दिलेल्या अभिप्राय
६) मा .आयुक्त यांचेकडील दिनांक ७/०१/२०१७ चा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी -१८. लेखा विभाग
क्र. लेखा/१अ/कावि/११२५/२०१७
दिनांक :- ७/१ /२०१७

विषय :- मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१६ पासून सुधारीत दराने महागाई भत्ता मंजूर करण्याबाबत...

आदेश,

केंद्र शासनाचे वित्त विभागाकडील ज्ञापन क्रमांक१/३/२००८ E.II(B) दि.९/११/२०१६ अन्वये केंद्र सरकारचे ज्या कर्मचा-यांना ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आल्या नाहीत, त्या केंद्रीय कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१६ पासून १२५ टक्के वरुन १३२ टक्के प्रमाणे महागाई भत्ता वाढ मंजूर केलेली आहे. महापालिका कर्मचा-यांना केंद्रीय कर्मचा-यांप्रमाणे महागाई भत्ता लागू करण्याचे धोरण उपरोक्त वाचले क्र १ अन्वये ठरलेले असल्याने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना दिनांक १ जुलै २०१६ पासून महागाई भत्ता वाढ मंजुर करणे आवश्यक आहे.

सबब, उपरोक्त वाचले क्रमांक १ ते ५ च्या अनुषंगाने पिंपरी चिंचवड मनपा कर्मचा-यांना केंद्रशासकीय कर्मचा-यांप्रमाणे दिनांक १ जुलै २०१६ पासून सहावा वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन सरंचनेतील वेतन बॅंड मधील वेतन अधिक ग्रेड वेतनावर अनुज्ञेय महागाई भत्ता १२५ टक्के ऐवजी १३२ टक्के प्रमाणे लागू करण्यात येत आहे. माहे जानेवारी २०१७ चे वेतन १३२ टक्के महागाई भत्ता विचारात घेऊन काढण्यात यावे. तसेच माहे जुलै २०१६ ते डिसेंबर २०१६ पर्यंत देय महागाई भत्याची थकबाकी माहे जानेवारी २०१७ चे वेतन देयका बरोबर काढण्यात यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -१८

प्रति,

सर्व संबंधित शाखाप्रमुख

प्रत :-
१) आयुक्त कक्ष २) मा. अति आयुक्त कक्ष
३) मा.मुख्यलेखापरिक्षक ४) मा. कामगार कल्याण अधिकारी
५) संगणक अधिकारी ६) सहा. आयुक्त , प्रशासन
२/- वरील आदेशानुसार पगार बिलांमध्ये आवश्यक ते बदल करण्यात यावेत.
७) अध्यक्ष, पिं.चिं. मनपा कर्मचारी महासंघ , पिंपरी – १८
२/- माहिती साठी सादर